CNRNOMHSN090001002026

**नियमित दिवाणी दावा क्रमांक १२/२०२६.**
**निशाणी क्रमांक ५ खालील आदेश.**

| | | |
|---|---|---|
| ०१. | बाजीराव जाधव | **वादी.** |
| | ***विरुध्द.*** | |
| ०१. | राजेंद्र यादव व इतर | **प्रतिवादी.** |

**(०१).** अर्ज वाचला. वादीतर्फे वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

**(०२).** वादीतर्फे वकीलांनी युक्तिवाददरम्यान असे सांगितले की, वादीने प्रस्तुतचा दावा जाहीर होवुन मिळण्याकरीता, मनाई आदेशाकरीता व अग्रहक्क ठरवुन मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. दावा मिळकती या वादी व प्रतिवादी क्र. २ ते ५ यांच्या वडिलोपार्जित मिळकती असुन त्या त्यांच्या सामाईकातील मिळकती आहेत. प्रतिवादी क्र. २ ते ५ यांनी वादीची कोणतीही संमती न घेता दावा मिळकतीपैकी काही क्षेत्र प्रतिवादी क्र. १ ला विक्री केलेले आहे व उर्वरीत क्षेत्र ते विक्री करु पहात आहेत. त्याकरीता विक्री करण्यासंदर्भात व्यवहार झाला असुन त्याचा खरेदीदस्त होण्याची दाट शकयता आहे. तसेच प्रतिवादी क्र. १ हा त्याच्याकडे असलेल्या बेकायदेशीर खरेदी दस्ताच्या आधारे वादीला हरकत अडथळा करण्याची शकयता असल्याने प्रस्तुतचा अर्ज मंजूर करुन प्रतिवादी विरुध्द तुर्तातूर्त ताकिद देण्यात यावी अशी त्यांनी विनंती केली आहे.

**(०३).** अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. वादीचा दावा हा जाहीर होवुन मिळण्याकरीता, मनाई आदेशाकरीता व अग्रहक्क ठरवुन मिळण्याकरीता आहे. दावा मिळकत वादी व प्रतिवादी क्र. २ ते ५ यांच्य सामाईक कब्जात आहे असे वादीचे कथन आहे. प्रतिवादी क्र. २ ते ५ यांनी प्रतिवादी क्र. १ ला करुन दिलेले खरेदीखत वादीने

अभिलेखावर दाखल केलेले आहे. त्यावरुन प्रथमदर्शनी असे दिसुन येते की, प्रतिवादी क्र. २ ते ५ हे उर्वरीत मिळकती विक्री करण्याची शकयता आहे. तसेच प्रतिवादी क्र. १ हा देखील त्याला मिळालेल्या खरेदी खताच्या आधारे वादीस हरकत अडथळा करण्याची देखील शकयता आहे. असे झाल्यास निश्चितच वादीचे नुकसान होणार आहे. यास्तव प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी दावा मिळकतीची आहे ती परीस्थिती कायम ठेवावी असे त्यांना आदेशीत केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही असे प्रथमदर्शनी दिसते. यास्तव मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश.

**०१.** प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी प्रस्तुत दाव्यात हजर होवुन कैफियत व म्हणणे दाखल करे पावेतो दावा मिळकतीची आजची आहे ती परीस्थिती कायम ठेवावी असे प्रतिवादी क्र. १ ते ५ यांना आदेशीत करण्यात येते.

**०२.** सदर अर्जाचा खर्च दाव्यात समाविष्ट करण्यात येतो.

SATISH YASHWANT WAKCHAURE
Digitally signed by SATISH YASHWANT WAKCHAURE
Date: 2026.01.31 18:03:04 +0530

**तासगांव.** (एस.वाय.वाकचौरे)
दिनांक : ३१.१.२०२६. सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
**तासगांव.**

मी हमी देतो की, सदरच्या पी.डी.एफ. फाईल मधील सर्व मजकूर हा मुळ आदेशातील प्रत्येक शब्दानुसार बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | – | श्री. अभय अरविंद रणदिवे |
| न्यायालय | – | सहदिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, तासगांव, जिल्हा सांगली. |
| दिनांक | – | ३१.१.२०२६. |
| न्यायीक अधिकारी यांनी सही केलेली दिनांक | – | ३१.१.२०२६. |
| आदेश अपलोड दिनांक | – | ३१.१.२०२६. |